नि.दि.दा.क्र.५७८/२०१६
संग्राम विरुध्द दत्तात्र्य
**CNR NO.MHSO**07-000735-2016

## निशाणी क्र. १८ कडील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ नुसार न्यायालयीन आयुक्ताद्वारे मौजे सुस्ते, ता. पंढरपूर येथील गट नं. २५१/२ क्षेत्र ४० आर ची मोजणी होऊन हद्दीखुणा कायम करुन अतिक्रमीत भाग दर्शविणा-या नकाशासह अहवाल सादर करण्यासाठी दाखल करण्यात आला आहे.

०२. अर्जातील कथन थोडक्यात असे आहे की, प्रस्तुतचा दावा वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी उत्तर बाजुने केलेल्या २० आर अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी आणि कायम मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. या कारणास्तव वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची मागणी केली आहे. याउलट प्रतिवादी यांनी नि.क्र. २२ कडे आपले म्हणणे दाखल करुन वादी व प्रतिवादी यांच्या शेतजमीनीमध्ये शासनाची ४७ आर जमीन आहे. प्रस्तुतचा अर्ज पुरावा गोळा करण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे. यदाकदाचित न्यायालय अर्ज मंजुर करण्याच्या मतांस आल्यास गट नं. २५१ व २५२ यांची वादीच्या खर्चाने मोजणी व्हावी अशी मागणी केली आहे.

०३. वादीतर्फे विद्वान वकिल श्री. डी. एन. सरडे आणि प्रतिवादीतर्फे विद्वान वकिल श्री. डी. एस. देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांच्या विद्वान वकिलांनी वादी व प्रतिवादी यांच्या शेतजमीनीच्या दरम्यान शासनाची जमीन आहे. शासनाला पक्षकार करण्यात आले नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा असा युक्तीवाद केला. वादपत्र आणि लेखी जबाब यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा अतिक्रमीत क्षेत्र परत मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप पाहता मौजे सुस्ते, ता. पंढरपूर येथील गट नं. २५१ आणि २५२ या दोन्ही गटांची मोजणी झाल्याशिवाय दाव्याचा निकाल गुणवत्तेवर लागू शकत नाही. करिता मी खालील आदेश पारित करतो.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. उपाधिक्षक, तालुका भुमीअभिलेख कार्यालय, पंढरपूर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यात येते.

०३. न्यायालयीन आयुक्त यांना मौजे सुस्ते, ता. पंढरपूर येथील संपूर्ण गट नं. २५१ आणि २५२ या दोन्ही गटांची मोजणी करुन हद्दी खुणा कायम कराव्यात आणि प्रतिवादी यांनी अतिक्रण केले असल्यास त्याबाबत खुलासा, प्रत्यक्षदर्शी वस्तुस्थिती नकाशासह दि. १९/११/२०१८ पर्यंत सादर करावे.

०४. वादी यांनी मोजणीसाठी आवश्यक असणारी फी उपाधिक्षक, तालुका भुमिअभिलेख, पंढरपूर यांच्या कार्यालयात दि. ०२/११/२०१८ च्या पुर्वी जमा करावी.

०५. वादी यांनी मोजणी कामी असणारे उपरोक्त गटांचे ७/१२ उतारे दि. ०२/११/०१८ च्या पुर्वी न्यायालयात सादर करावे.

०६. येणेप्रमाणे कमिशनपत्र जारी करण्यात यावे.

(न्यायासनावर निवेधीत आणि अधिघोषीत)

**सथळ – पंढरपूर**
**दि. ०५/१०/२०१८**

**(सं. गं. सरोदे)**
**३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**पंढरपूर.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment / Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B.M.Thakur (Junior Clerk) |
| Court | : | 3rd Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Pandharpur |
| Date | : | 05.10.2018 |
| Judgment / order signed by the Presiding Officer on | : | 05.10.2018 |
| Judgment / order uploaded on: | | **09.10.2018** |

**Uploaded**